# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.४८५६-अ/२३/अ.क्र.८८०२/२५/०१**

**श्री. जुगलकिशोर देवीलाल अग्रवाल**
ह.मु.पो.ता. पाचोरा, संघवी कॉलनी,
जि. जळगाव – ४२४२०१.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कक्ष अधिकारी**
राज्य माहिती आयोग, मुख्यालय
१३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मंत्रालयसमोर, मुंबई – ४०००३२.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव**
राज्य माहिती आयोग, मुख्यालय
१३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मंत्रालयसमोर, मुंबई – ४०००३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.११.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, मुख्यालय, श्री. अभय भंडारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, मुख्यालय श्रीमती सायली सावंत, विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव, राज्य माहिती आयोग, मुख्यालय, श्रीमती सविता जावळे, तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव (प्र.), राज्य माहिती आयोग, मुख्यालय, श्री. श्या.र.चौरे उपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०५.१२.२०२२ रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "महाराष्ट्र राज्य माहिती आयोग मुख्यालय, १३वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयसमोर, मुंबई – ४०००३२ यांच्याकडे द्वितीय अपील क्रमांक मुमाआ/नों.क्र.८०८७/२१/अ.क्र.१३९०/२२/०१ दि. १४.०७.२०२१ रोजी या

अपीलासंबंधित रोजनामा, अर्जदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेले दस्ताऐवज, जाबजबाब व प्रकरणातील प्राप्त व निर्गमित केलेल्या दस्ताऐवज, आवक जावकाची नोंद असलेल्या रजिस्टर सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती सही शिक्कासह तारखेनिशी मिळण्याबाबत" या अनुषंगाने माहितीची मागणी केलेली आहे. त्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०१.२०२३ रोजी "आपण मागणी केलेली व त्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यासाठी माहितीचे एकूण २४ पृष्ठे प्रतींकरिता रु.२/- एकूण माहिती शुल्क रु.४८/- व टपाल खर्च रु. ४२/- असे एकूण रु. ९०/- इतके शुल्क दि. ३०.०१.२०२३ पर्यंत डिमांड ड्राफ्टने अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करुन अथवा (राज्य शासकीय कार्यालयाचे बाबतीत "००७०-इतर प्रशासनिक सेवा,६०,इतर सेवा,८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखा शिर्षावर चलनाने शासकीय कोषागारात जमा करुन) शुल्क भरल्याची पावती / चलन अथवा पुरावा सत्य प्रत या कार्यालयात समक्ष अथवा पोस्टाने सादर करावी", असे उत्तरान्वये कळविण्यात आले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना विहीत मुदतीत प्रतिसाद दिला असून अपीलार्थी यांनी दि. ०६.०१.२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन दि.२०.०१.२०२३ रोजी मनी ऑर्डरद्वारे रु.९०/- शुल्क पाठविले आहे. तसेच त्यापूर्वी दि. ०७.१२.२०२२ रोजी मनी ऑर्डरद्वारे रु. १००/- शुल्क भरलेले आहे, असे नमूद केले आहे.

त्यानंतर अपीलार्थी यांनी "जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्यात आली नाही" असे आक्षेप नोंदवित प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव (प्र.), राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांनी दि. १०.०३.२०२३ रोजी प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेऊन "अपीलार्थी यांना माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपीलार्थीस १५ दिवसांत पुरविण्याची कार्यवाही करण्यात यावी", यासह प्रथम अपील अर्ज मान्य करुन निकाली काढण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव (प्र.), राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांनी दि ०६.०१.२०२३ रोजीच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली २४ पृष्ठ संख्येची माहिती पुरविण्याबाबत निर्देशित केले आहे. अपीलार्थी यांनी दि. ३०.०६.२०२३ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला आहे.

या अपीलासंदर्भात कागदपत्राचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव (प्र.), राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांनी दि. १५.०३.२०२३ च्या आदेशान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांनी अपीलार्थीस दि. २०.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये "दि. ०५.१२.२०२२ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने

दि. १०.०३.२०२३ रोजी झालेल्या प्रथम अपील सुनावणीच्या आदेशानुसार द्वितीय अपील क्र. मुमाआ/नों.क्र.८०८७/२१/अ.क्र.१३९०/२२/०१ सुनावणी दि. १२.१०.२०२२ रोजी झालेल्या द्वितीय अपीलातील नस्तीमधील सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या आहे", असे कळवून कार्यवाही केल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते.

ही बाब लक्षात घेता, प्रथम अपील आदेशानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांनी जोडपत्र-अ मध्ये मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली आहे.

सदर प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना यापुर्वीच प्रदान झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तूत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २६.११.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**प्रत :-**

१. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव (प्र.), राज्य माहिती आयोग, मुख्यालय, श्री. श्या.र.चौरे यांना द्वितीय अपील आदेशाची प्रत माहितीस्तव सादर.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, मुख्यालय, श्रीमती सायली सावंत यांना द्वितीय अपील आदेशाची प्रत माहितीस्तव सादर.